जनसंपर्क कक्ष
02 APR 2023
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठ महिला क्रिकेट संघ.

# विद्यापीठ संघास तृतीय क्रमांक

## पश्चिम विभागीय क्रिकेट; अखिल भारतीय स्पर्धेस पात्र

कोल्हापूर, ता. १ : भुवनेश्वर (ओडिशा) येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट संघाने स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. हा संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी प्रथमच पात्र ठरला आहे.

संघात भक्ती मिरजकर (कर्णधार), आदिती गायकवाड, संजना वाघमोडे, अंकिता भरती, सायली मोहिते, साक्षी गणे, गायत्री दुबल, सानिका लाड, समृध्दी फोफळे, प्रज्ञा कांबळे, ऋतुजा चतुरे, ऋतुजा जाधव, स्नेहा साळे, सौम्यालता बिराजदार, ऋतुजा सुखसारे, अमृता पाटील यांचा समावेश आहे. प्रशिक्षक म्हणून डॉ. रोहित पाटील काम पाहत आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे संघास प्रोत्साहन मिळाले.

0 2 APR 2023
जनसंपर्क कक्ष
तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ महिला क्रिकेट संघाचा डंका!

## इतिहासात प्रथमच अखिल भारतीय स्पर्धेला पात्र

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघाने इतिहासात प्रथमच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे. ओडिसातील भुवनेश्वर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तृतीय क्रमांक संपादन करत दिमाखात अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र सिद्ध केली.

कर्णधार भक्ती मिरजकर हिच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठ संघाने नेत्रदीपक कामगिरीचे प्रदर्शन घडविले. दरम्यान, अखिल भारतीय स्पर्धेसाठी जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ व्ही. एन. शिंदे, क्रीडा



**कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत तृतीय क्रमांक संपादन केलेला आणि अ. भा. स्पर्धेस पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ महिला क्रिकेट संघ चषकासह.**

संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या. संघाचे प्रशिक्षक म्हणून डॉ. रोहित पाटील जबाबदारी पार पाडत आहे.

शिवाजी विद्यापीठाचा महिला संघ असा : भक्ती मिरजकर (कर्णधार), आदिती गायकवाड, संजना वाघमोडे, अंकिता भरती, सायली मोहिते, साक्षी गणे, गायत्री दुबल, सानिका लाड, समृध्दी फोफळे, प्रज्ञा कांबळे, ऋतुजा चतुरे, ऋतुजा जाधव, स्नेहा साळे, सौम्यालता बिराजदार, ऋतुजा सुखसारे, अमृता पाटील.

02 APR 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा महिला क्रिकेट संघ पात्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेसाठी जाणाऱ्या संघास शुभेच्छा व मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तसेच प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे व प्रशिक्षक डॉ. रोहित विजय पाटील. विजयी संघामध्ये भक्ती मिरजकर (कर्णधार), आदिती गायकवाड, संजना वाघमोडे, अंकिता भरती, सायली मोहिते, साक्षी गणे, गायत्री दुबल, सानिका लाड, समृद्धी फोफळे, प्रज्ञा कांबळे, ऋतुजा चतुरे, ऋतुजा जाधव, स्नेहा साळे, सौम्यालता बिराजदार, ऋतुजा सुखसारे, अमृता पाटील इत्यादी.



तरूण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार जाहीर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा यंदाचा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना जाहीर झाला आहे. सिक्कीमचे माजी राज्यपाल, खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते गुरुवार, १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता शिवाजी विद्यापीठात हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. स्मृतिचिन्ह, मानपत्र व १ लाख ५१ हजार रोख असे या पुरस्काराचे स्वरुप असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

- **सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते १३ एप्रिलला वितरण**
- **कुलगुरू डॉ. शिर्के यांची माहिती**

यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत उपस्थित होते.डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराच्या शोध समितीने २०२३ च्या पुरस्कारासाठी डॉ. शिवाजीराव कदम यांची निवड केली. डॉ. कदम यांनी प्रभावी शिक्षणतज्ज्ञ, कुशल प्रशासक, संशोधक, समाजसेवक म्हणून दिलेले योगदान विचारात घेतले आहे. यापूर्वी हा पुरस्कार भारतरत्न प्रा. सी. एन. आर. राव, रयत शिक्षण संस्था, सातारा, डॉ. जब्बार पटेल, प्रा. एन. डी. पाटील आणि डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान केला असल्याचे सांगितले.




शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागामार्फत पूर्वा नाडगोडा यांचा मेघा पानसरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी स्नेहल शेट्ये उपस्थित होत्या.

# विद्यापीठाच्या पूर्वा नाडगोडा यांची जपानला भरारी

## विदेशी भाषा विभागातील विद्यार्थिनी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थिनी पूर्वा नाडगोडा हिची फुजित्सु लिमिटेड या जपानी कंपनीमध्ये नियुक्ती झाली असून, ती कंपनीच्या कामाकरिता दोन वर्षांसाठी जपानमधील टोकियोला रवाना होत आहे.

पूर्वा नाडगोडा हिने विदेशी भाषा विभागामधून जपानी भाषेचा सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्स पूर्ण केला आहे. त्याचबरोबर तिने विभागात दिल्या जाणाऱ्या जे.एल.पी.टी. या आंतरराष्ट्रीय परीक्षेच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला आणि ती परीक्षा उत्तीर्ण झाली. पूर्वा आता या कंपनीमध्ये इंजिनिअर म्हणून काम करीत असून, एप्रिलमध्ये दोन वर्षांकरिता कंपनीच्या कामाकरिता जपानला जात आहे. त्या निमित्ताने विदेशी भाषा विभागातर्फे तिचा सत्कार करण्यात आला. पूर्वा नाडगोडा हिनेविभागात दिल्या जाणाऱ्या जे.एल.पी.टी. या आंतरराष्ट्रीय परीक्षेच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला असून ती परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, पूर्वाने मिळवलेले हे यश विद्यापीठासाठी भूषणावह आहेच; पण इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी पूर्वा नाडगोडा यांच्याशी मुक्त संवाद साधला. शिक्षण आणि करिअरसंदर्भात अनेक प्रश्न विचारून माहिती घेतली. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, पवन नाडगोडा उपस्थित होते. स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले.

पुढारी

# ४९ हजार ८६३ पदवी प्रमाणपत्रे पोस्टाने रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभातील पोस्टाद्वारे ४९ हजार ८६३ पदवी प्रमाणपत्रे ३० मार्च रोजी एका दिवसात परीक्षा विभागाकडून पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी दिली.

दीक्षांत समारंभास प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी १६ हजार ५९४ विद्यार्थ्यांनी समक्ष पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी अर्ज केले होते. ४९ हजार ८६३ विद्यार्थ्यांनी पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रांची मागणी केली होती.

दीक्षांत समारंभात ९ हजार २८७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्रे स्वीकारली आहेत. उर्वरित ७ हजार ३०७ विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभादिवशी स्वीकारलेली नाहीत. अशा विद्यार्थ्यांना पुढील दहा दिवसांमध्ये पदवी प्रमाणपत्रे स्वीकारण्याबाबत मोबाईलवर संदेश पाठवून कळवले जाईल. त्यानंतरही जी पदवी प्रमाणपत्रे स्वीकारली गेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना १० दिवसांनंतर पोस्टाद्वारे पत्त्यावर पाठविण्यात येतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 APR 2023
पुढारी

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ७८ हजार विद्यार्थी

शिवाजी विद्यापीठातून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सुरू आहेत. शुक्रवारी बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए., एम.ए., बी.बी.ए., बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), बी.टेक. आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये, अधिविभागात सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी ७८ हजार १९७ विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, शुक्रवारी एम.एस्सी. (झुलॉजी), बी.एस्सी. या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजअखेर ३३२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनास देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी प्रा. डॉ. राजेंद्र पाटील यांनी एक लाख रुपयांची देणगी कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. डॉ. पाटील विद्यापीठाचे समाजशास्त्र माजी विभागप्रमुख व महावीर अध्यासनाचे माजी समन्वयक आहेत. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले आदी उपस्थित होते.